पुढारी दि. 14/11/2023

'विवेकानंद'मध्ये कर्करोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय विषयावर व्याख्यान

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात 'कर्करोगाची लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाय' विषयावर प्राध्यापक प्रबोधिनी यांच्या वतीने व्याख्यान झाले. सांगोला महाविद्यालयाचे. प्रकाश बनसोडे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणित विभागप्रमुख डॉ. एस. पी. थोरात होते. भारतात कर्करोगाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. कर्करोगावर मात करण्यासाठी भाज्या मिठाच्या पाण्यात धुऊन खाणे, मानसिक ताणतणाव कमी करणे, चांगल्या जीवनशैलीचे आचरण करणे यांसारख्या गोष्टी महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी सांगितले. प्राध्यापक प्रबोधिनीचे प्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर प्रास्ताविक यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. संजय अंकुश यांनी करून दिली. प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. कैलास पाटील यांनी आभार मानले.

14.11.